CC MM YY KK

दैनिक
# लोकभवन

RNI. NO. MAHMAR/2017/73605

संपादक : आनंद कांबळे

● वर्ष : १ ● अंक : १०३ ● गुरुवार, १० मे २०१८ ● पुणे ● पाने : ४ ● किंमत ₹ २

## असा पार पडला सोनम कपूरचा विवाह

**मुंबई (प्रतिनिधी) :** बॉलिवूडची अभिनेत्री सोनम कपूर हिचे आज दोनाचे चार हात झाले. सोनम कपूर आणि तिचा प्रियकर आनंद आहुजा हे दोघे मंगळवारी विवाहबद्ध झालेत. या विवाहसोहळ्याला चंदेरी दुनियेतील तारे-तारकांची उपस्थिती होती. सोनमच्या विवाहाचा विधी सध्या चर्चेचा विषय ठरतो आहे. सोनमचा विवाह हा हिंदू नव्हे तर शिख धर्माच्या पद्धतीनुसार पार पडला.



सोनम कपूरचा दिमाखदार विवाह सोहळा 'आनंद कारज' पद्धतीने झाला. शिख धर्मातील या पद्धतीनुसार सोनमने विवाह केल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. आनंद कारज हा हिंदू धर्माच्या विवाह पद्धतीपासून पूर्णपणे वेगळा प्रकार आहे.

आनंद कारजची रसम सकाळी पार पडते. पारंपरिक हिंदू विवाहांमध्ये लग्न, मुहूर्त, जन्मपत्रिका मिळवणे गरजेचे असते पण आनंद कारजमध्ये याला विशेष महत्त्व नाही. शिख धर्मात जे लोक गुरूवर पूर्ण श्रद्धा ठेवतात तेच आनंद कारज पद्धतीचा अवलंब करतात. त्यांच्यासाठी प्रत्येक दिवस पवित्र मानला जातो.

पर्यटकांवर हल्ले ...संपादकीय २
यंदा पिंपरी-चिंचवडकरांना पाणीकपात नाही : आयुक्त हर्डीकर २
तहसील कार्यालयातील स्वच्छतागृहाची दुरवस्था ३
वाढत्या महागाईविरोधात माहिती अधिकार मंचतर्फे जाहीर निषेध ३
पंतप्रधानांचे वक्तव्य गावच्या सरपंचासारखे : ॲड. प्रकाश आंबेडकर ४
पत्नी, मुलीवर पेट्रोल ओतून पतीची रेल्वेखाली आत्महत्या ४
भारतीय नागरिक २०१९ला मोदींना मत देणार नाहीत : अय्यर ४

# इव्हीएमवर भरवसा ठेऊ नका : यशवंत सिन्हा

### ● काँग्रेसला श्रेय मिळू नये म्हणून सरकारने जीडीपीचा खोटा आकडा दाखवला

**पणजी :** इलेक्ट्रोनिक वोटिंग मशिन्सवर (इव्हीएम)भरवसा ठेऊ नका, लोकांचे मत वेगळे आणि मशिन्सचे मत वेगळे होण्याची पूर्ण शक्यता असल्याचा इशारा माजी केंद्रीय अथर्मंत्री यशवंत सिन्हा यांनी दिला आहे. दोनापावला येथील इंटरनेशनल सेंटरमध्ये बोलताना त्यांनी देशात अघोषित आणिबाणी लागू करण्यात आल्याचे सांगितले.

सिटिझन्स फॉर डेमॉक्रोसी या संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलताना सिन्हा यांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारवर कडक टीका केली. इव्हीएमवर भरवसा ठेवणे कठीण असून



इव्हीएमचे मत आणि लोकांचे मत हे सारखे असेलच हे सांगता येत नाही. काही ठिकाणी घेण्यात आलेल्या चाचणीत ९ इव्हीएमद्वारे करण्यात आलेल्या मतदानात १० पैकी ८ मते ही भाजपच्या बाजूने झाली होती असे त्यांनी सांगितले. मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याचा आपला आग्रह असल्याचेही त्यांनी सांगितले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दिवसात कपात करण्याचे काम या सरकारने केले असून हा प्रकार दुर्दैवी असल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वी तीन दिवस सामान्य अर्थसंकल्पावर तर ३ दिवस रेल्वे अर्थसंकल्पावर चर्चा केली जात होती. आता दोन्ही अर्थसंकल्प एकत्र केल्यानंतर दोन्ही अर्थसंकल्पांना मिळून दीड दिवसच दिला जातो. त्यातही चर्चा होवू दिली जात नाही. अण्णाद्रमुक पक्षाचे खासदार सभागृहात गोंधळ घालतात आणि कामकाज स्थगित ठेवले जाते. अण्णाद्रमुक हा भाजपाशी जवळीक असलेला पक्ष असून हे हेतूपुरस्सर सरकारपक्षाकडूनच केले जाते असा आरोपही त्यांनी केला.

देशाचा आर्थिक विकास हा खुंटला गेला आहे. सरकारकडून चुकीचे आकडे दाखविले जात आहेत. २०१४ साली दाखविण्यात आलेला ४.५ हा विकास दर चुकीचा असून तो ६.५ एवढा होता. काँग्रेसला श्रेय मिळू नये म्हणून तो चुकीच्या पद्धतीने चुकीचा दर दाखविण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या ४ न्यायाधीशांनी पत्रकार परीषद घेऊनही देशातील लोक सावध होत नसेल तर ते दुर्दैवी असल्याचे त्यांनी सांगितले.

### ■ मंत्री नव्हे लोकांचा संत्री: शत्रुघ्न

आपल्याच पक्षाच्या विरोधात रणशिंग फुंकलेले भाजपचे खासदार शत्रुघ्न सिन्हा यांनी मंत्री नव्हे आपण जनतेसमोर खरे ते बोलू नये म्हणून आपल्याला मंत्रीपदाची लालच दाखविली जात असल्याचे सांगितले. परंतु आपण मंत्री बनण्यापेक्षा जनतेचा संत्री होणे पसंत करेन, असे त्यांनी सांगितले. देशात अत्यंत वाईट परिस्थिती असून दलित, अल्पसंख्याक, शेतकरी व कामगार वर्ग दहशतीच्या छायेत असल्याचेही त्यांनी सांगितले.

# हळद उतरण्यापूर्वीच नवरदेवाचा अपघाती मृत्यू

### ● नवविवाहितेच्या सुखी जीवनाच्या स्वप्नांची राखरांगोळी

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** लग्नानंतर देवदर्शन करुन परत येत असताना नवदाम्पत्याच्या गाडीला बुधवारी अपघात झाला. यात नवरदेवासह एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

अमित शंकर गोडसे असे या अपघातात मुत्यूमुखी पडलेल्या नवरदेवाचे नाव आहे. बदनापूर तालुक्यातील खेडगाव येथील रहिवासी आहे. शुक्रवारी (४ मे) त्याचा विवाह झाला होता. लग्नानंतर देवदर्शनासाठी तुळजापूर येथे गेले असता तेथून परतत असताना हा भीषण अपघात



झाला. त्यांच्या कारची एका दुधाच्या गाडीला जोरदार धडक बसली. त्यात नवरदेवाचा अंत झाला. या दुर्घटनेत नवरदेवासह आणखी एकाचा मृत्यू झाला आहे.

या दुर्घटनेत ६ ते ७ जण जखमी झाले आहेत. जखमींना औरंगाबादच्या घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## संक्षिप्त बातम्या

### उत्तर भारत भूकंपाने हादरला

**दिल्ली :** एनसीआरसह उत्तर भारत भूकंपाच्या धक्क्याने हादरला. दुपारी सव्वा चार वाजेच्या सुमारास उत्तर भारताला भूकंपाचे हादरे बसले. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण होतं. रिश्टर स्केलवर भूकंपाची तीव्रता ६.२ इतकी नोंदवली गेली. अफगाणिस्तान-ताजिकिस्तान आणि पाकिस्तानमध्ये या भूकंपाचा अधिक प्रभाव जाणवला.

ताजिकिस्तानच्या इश्काशिमपासून ३६ किलोमीटर अंतरावर भूपृष्टाखाली १११.९ किमी खोलवर भूकंपाचे केंद्र होते. दिल्लीसोबतच हिमाचल प्रदेशातील कुल्लू, शिमला आणि जम्मू-काश्मीरच्या काही भागांमध्ये भूकंपाचे हादरे जाणवले. भूकंपासह दिल्लीत काही भागांत धुळीचे वादळ आल्याने पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. भारतासह अफगाणिस्तानची राजधानी काबूललाही भूकंपाचे हादरे बसले. पाकिस्तानमध्ये इस्लामाबादसह अनेक शहरांमध्येही भूकंपाचे हादरे जाणवले.

### काश्मीरमध्ये 'लश्कर'चे ६ अतिरेकी जेरबंद



**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या बारामुलामध्ये भारतीय सुरक्षा दलाने लष्कर-ए-तोयबाच्या एका मोठ्या मॉड्यूलचा भांडाफोड केला आहे. सुरक्षा दलांनी आज सहा अतिरेक्यांच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठाही जप्त केला आहे. हे सहाही अतिरेकी लष्कर-ए-तोयबाचे सदस्य असून त्यांच्यावर स्थानिकांच्या हत्येचा आरोप आहे.

लष्कर-ए-तोयबाचा अटकेत असलेला दहशतवादी जबीउल्लाने भारतात मोठ्या प्रमाणावर दहशतवादी हल्ला करण्यासाठी घुसखोरी केल्याची कबुली राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे दिली होती. त्याच्यासोबत इतर पाच अतिरेकीही भारतात घुसले होते. मात्र सुरक्षा दलाच्या जवानांसोबत झालेल्या चकमकीत हे पाचही दहशतवादी ठार झाले होते. जबीउल्ला मात्र तिथून पळून जाण्यात यशस्वी ठरला होता. त्यानंतर ६ एप्रिल रोजी कुपवाडामधील जुगियाल गावातून त्याला अटक करण्यात आली होती. त्यानंतर जबीउल्ला सोबत आणखी काही अतिरेक्यांनी भारतात घुसखोरी केली का? याचा शोध घेत असतानाच सुरक्षा दलाच्या जवानांनी आज सहा अतिरेक्यांच्या मुसक्या आवळल्या. या सहाही जणांवर बारामुलामधील तीन स्थानिक नागरिकांची हत्या केल्याचा आरोप आहे.

## रेल्वेतील खाद्यपदार्थ महागणार

**नवी दिल्ली :** रेल्वे वाहतुकीचं साधन आहे. त्यामुळे रेल्वेला रेस्टॉरन्ट, हॉटेल किंवा खानावळ मानता



येणार नाही, असं अथॉरिटी ऑफ ॲडव्हान्स रुलिंगने (एएआर) स्पष्ट केलं आहे. त्यामुळे रेल्वेत देण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांवरील जीएसटीत सूट मिळणार नसल्याने रेल्वेतील खाद्यपदार्थांचे दर वाढणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं. रेल्वेतील खाद्यपदार्थांच्या पुरवठ्यावर सामान्य जीएसटी लागणार असल्याचं दिल्ली एएआरनं स्पष्ट केलंय. गेल्यावर्षी केंद्र सरकारने जीएसटीवर ५ टक्के सवलत देण्यात येत असल्याचं परिपत्रक जारी केलं होतं. मात्र एएआरनं हे परिपत्रक रेल्वेतील खाद्यपदार्थांना लागू होणार नसल्याचं स्पष्ट केलं आहे.

## दगड चुकविण्याच्या प्रयत्नात सिमेंट कॉंक्रिटचा मिक्सर कालव्यात, एक जण ठार

**भोर (प्रतिनिधी) :** करंजे (ता. भोर) गावाजवळ नीरादेवघर धरणाच्या उजव्या कालव्याच्या भरावावरील दगड चुकविताना सिमेंट कॉंक्रिटचा मिक्सर ३० फूट खोल कालव्यात पडून झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार व दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना बुधवारी सकाळी ७ वाजता घडली.

याबाबत राम किसनराव साळुंके (वय ४४) याने फिर्याद दिली आहे. या अपघातात दलित विष्णू व्यवहारे (वय ३२, रा. कंदार, जि. नांदेड, सध्या रा. निगुडघर, ता. भोर) याचा जागीच मृत्यू झाला. नरसिन्ना कृष्णय्या व सिन्नू वेंकटय्या गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

भोर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नीरादेवघर धरणाच्या उजव्या कालव्याच्या अस्तरीकरणाच्या कॉंक्रिटचे काम सुरू आहे. हे काम आर. बी. घोडके यांनी घेतले आहे. या कामासाठी लागणारे कॉंक्रिट



नाटंबी येथे मिक्सिंग केले जात आहे. ते मिक्सर (टीएम एमएच २२ एन २८०३) मध्ये भरून आज सकाळी मिक्सर कालव्याच्या कडेने चालक पंढरीनाथ जळवा व्यवहारे (रा. बोरी, ता. कंदार, जि. नांदेड) करंजे गावाच्या पाठीमागील बाजूस काम सुरू असलेल्या ठिकाणी घेऊन जात होता. या वेळी कालव्याच्या भरावावर असणारा दगड चुकविण्याच्या प्रयत्नात मिक्सर कालव्याच्या बाजूला जाऊन दोन वेळा उलटून ३० फूट खोल कॅनॉलमध्ये पडला. यावेळी चालकाने उडी मारल्याने तो बचावला, मात्र केबिनमध्ये बसलेले दलित विष्णू व्यवहारे ठार झाले. नरसिन्ना कृष्णय्या व सिन्नू वेंकटय्या गंभीर जखमी झाले आहेत. सुपरवायझर राम साळुंके यांनी जखमींना बाहेर काढून भोर उपजिल्हा रुग्णालयात आणले.

## नागपूर विभागात उष्माघाताचे १०९ रूग्ण, ९ जणांचा मृत्यू

**नागपूर :** विदर्भातील नागपूर विभागात सध्या सूर्य अक्षरश: आग ओकत आहे. विभागातील तापमानाचा पारा ४५ अंशापर्यंत पोहचला आहे. नागरिकांना या उन्हाचा प्रचंड त्रास होत आहे. परिणामी या वाढत्या तापमानामुळे यावर्षी नागपूर विभागात तब्बल १०९ लोकांना उष्माघात झाला आहे. तर उष्माघातसदृश आजाराने ६ जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

गेल्या २ दिवसांत उष्माघातामुळे ३ जणांचा मृत्यू झाला आहे. शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या या मृत्यूमध्ये हुडकेश्वर येथील भगवतीनगर येथे सोमवारी सायंकाळी बाबुराव मेश्राम यांचा मृतदेह आढळून आला, तर ताजुद्दीबाबानगरात लालजी शुक्ला यांचा मृतदेह आढळून आला आहे. तसेच बेसा परिसरात अशोक पांढारकर यांचा मृतदेह आढळून आला, सध्या नागपूरातील तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या वर आहे. त्यामुळे या तिघांचाही मृत्यू उष्माघाताने झाला असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. तर शवविच्छेदन अहवालातूनच या रुग्णांच्या मृत्यूचे नेमके कारण पुढे येईल, अशी माहिती आरोग्य



विभागाने दिली आहे. या प्रकरणात पोलीसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करुन पुढील तपास सुरु केला आहे.

दरम्यान यावर्षी नागपूर विभागातील सर्वच शहरांतील तापमानाचा पारा सध्या ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे वाढत्या उकाड्याने विदर्भातील नागरिक त्रस्त झाले आहेत. परिणामी सर्वत्र ताप, गॅस्ट्रो, अतिसार या आजारासह उन्हामुळे होणाऱ्या विविध आजारांचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. नागपूरच्या मेडिकल, मेयो, आयसोलेशनसह सर्व खासगी रुग्णालयांत गेल्या १० दिवसांत ४०० हून जास्त गॅस्ट्रो तसेच त्यासदृश्य आजारांच्या रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. नागपूर विभागात आतापर्यंत १०९ रूग्णांना उष्माघात झाल्याची नोंद आहे. या रूग्णांवर सध्या शासकीय रूग्णालयांमध्ये उपचार सुरु आहेत.

## कारचे चारही टायर फुटल्याने अपघात २ ठार

### मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर कारचा अपघातात ६ जण गंभीर जखमी

**पुणे (प्रतिनिधी) :** मुंबई पुणे एक्स्प्रेस वेवर असलेल्या कामशेत बोगद्यात भरधाव वेगात असलेल्या कारचे चारही टायर फुटल्याने अपघात झाला. या अपघातात २ जण ठार झाले आहेत तर ६ जण जखमी झाले आहेत अशी माहिती समोर आली आहे. दुपारी तीनच्या सुमारास हा अपघात झाला. या अपघातातील मृतांची आणि जखमींची नावे समजू शकलेली नाहीत.

मिळालेल्या माहितीनुसार,मुंबई वरून पुण्याच्या दिशेने निघालेल्या मोटारीला कामशेत बोगद्यात अपघात झाल्याची घटना घडली आहे.या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती



आहे,तर सहा जण गंभीर जखमी झाले असून त्यांना खासगी रुग्णालयात तातडीने दाखल केले आहे.भरधाव वेगात असलेल्या कारचे चारही टायर अचानक फुटल्याने हा अपघात झाल्याच पोलिसांनी सांगितले आहे. हा अपघात एवढा भीषण होता की,मोटारीचा चक्काचूर झाला आहे. या कारमध्ये पाच तरुण मुले आणि तीन मुली प्रवास करत असल्याचे सांगण्यात येते आहे. याप्रकरणी पुढील तपास कामशेत पोलीस करत आहेत.

# एन्काउंटरच्या नावाखाली दलित-मुस्लिमांच्या हत्या

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशात एन्काउंटरच्या नावाखाली खून केले जात असून त्यात मरणाऱ्यांमध्ये दलित आणि मुस्लिम समाजातील लोक सर्वाधिक असल्याचा धक्कादायक दावा मानवाधिकारासाठी काम करणाऱ्या एका स्वयंसेवी संस्थेने केला आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणीही या संस्थेने केली आहे.

'सिटीजन अगेन्स्ट हेट' या संस्थेने हा दावा केला असून तसा अहवालही त्यांनी तयार केला आहे.उत्तर प्रदेशात १६ आणि मेवात परिसरात झालेल्या १२ एन्काउंटरची माहिती या अहवालात देण्यात आली आहे. २०१७-२०१८ मध्ये हे एन्काउंटर झाले होते. सर्वोच्च न्यायालयातील वकील प्रशांत भूषण यांनी हे एन्काउंटर नसून खून असल्याचं म्हटलं आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं उत्तर प्रदेशात त्यांची स्वतंत्र टीम पाठवून या प्रकरणाची चौकशी करावी, असंही भूषण यांनी म्हटलं आहे.

'कोणताही न्याय न करताच या हत्या करण्यात आल्या आहेत. पोलिसांनी केलेल्या अशा प्रकारच्या हत्यांची चौकशी कनिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत केल्या जातात. अशा चौकश्यांना स्वतंत्र आणि निष्पक्षपाती चौकशी म्हणता येणार नाही. त्यामुळेच आयोगाने त्यांची स्वतंत्र टीम पाठवून या प्रकरणाची चौकशी करायला हवी,' असंही



भूषण यांनी सांगितलं. एन्काउंटरच्या नावाखाली करण्यात आलेल्या खूनांची चौकशी आयोगानं करावी म्हणून 'सिटीजन अगेन्स्ट हेट' या संस्थेच्या शिष्टमंडळाने आयोगाचे अध्यक्ष एच. एल. दत्तू यांची भेटही घेतली आहे.

### ■ बनावट एन्काउंटर देशभर

यूपी- ४५५, असाम- ६५, आंध्रप्रदेश- ६३, मणिपूर-६३३, झारखंड- ५८, छत्तीसगड- ५६, मध्यप्रदेश- ४९, तमिलनाडू- ४४, दिल्ली- ३६, हरयाणा- ३५, बिहार- ३२, पश्चिम बंगाल- ३०, उत्तराखंड- २०, राजस्थान-१९, महाराष्ट्र- १९, कर्नाटक- १८, गुजरात- १७, जम्मू-कश्मीर- १७, केरळ- ०३, हिमाचल- ०३.

योगी आदित्यनाथ यांच्या सरकारला एक वर्ष पूर्ण झालं आहे. या १२ महिन्यात १२०० एन्काउंटर करण्यात आले आहेत. त्यात ५० हून अधिक गुंडांना ठार मारण्यात आले आहे. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणावर एन्काउंटर होऊनही उत्तर प्रदेशातील गुन्हेगारीत काहीही कमी झाली नसल्याचंही उघड झालं आहे.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अहवालानुसार १ जानेवारी २००५ ते ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यंत म्हणजे गेल्या १२ वर्षात देशात १२४१ बनावट एन्काउंटर झाले आहेत. त्यातील ४५५ बनावट एन्काउंटर एकट्या उत्तर प्रदेशातील आहेत. याच १२ वर्षात उत्तर प्रदेश पोलिसांच्या कोठडीत ४९२ जणांचा मृत्यू झाला आहे.